वर्ष ७ अंक ५
सौर – ज्येष्ठ आषाढ १९३८

# समतोल

ज्ञान प्रबोधिनी
स्त्री-शक्ती प्रबोधन

## 'यश'



स्त्रीशक्तीच्या प्रबोधनाचे । ध्येय आपुले संतुलनाचे ।
समन्वयाचे सहभागाचे । समुन्नतीचे सुखसमृध्दीचे ।

# यशस्विनी

**- सुनंदा कवठेकर**

**जिद्दी स्त्रीच्या मागे सर्व कुटुंब उभे असले की ती किती यशस्वी होऊ शकते, याचे उदाहण म्हणजे हजारो विद्यार्थ्यांना सनदी लेखपाल (C.A) च्या परीक्षेत यशाचा मार्ग दाखवणाऱ्या रेखा जोशी.**



समतोलसाठी रेखा जोशी यांची मुलाखत घ्यायची असे ठरले. त्या संदर्भात एक-दोन वेळा मी त्यांच्याशी फोनवर बोलले तेव्हाच त्यांच्या अतिशय ऋजू अशा व्यक्तिमत्वाची मला जाणीव झाली. रेखाताई या Mrs. Joshi' Accounting Academy च्या संस्थापक, संचालक आहेत. CA च्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे कोचिंग क्लासेस घेणाऱ्या त्या पुण्यातल्या आणि महाराष्ट्राल्या सुध्दा एकमेव मराठी महिला आहेत. हे त्यांचं वैशिष्ट्य !

लग्नानंतर एक मुलगी झाल्यानंतर ती लहान असताना त्यांनी CA करण्याचा निर्णय घेतला आणि प्रथम प्रयत्नातच CA पूर्णही केलं. त्यांना त्यांच्या या निर्णयाबद्दल विचारलं तेव्हा त्या म्हणाल्या, ‘‘ मी मूळची धारवाडची. माझं शिक्षण कन्नड माध्यमातून झालं. वडील सरकारी नोकरीत, पोस्ट अँड टेलिग्राफ डिपार्टमेंटमध्ये ! आमचं थोडसं जुन्या वळणाचं मध्यमवर्गीय कुटुंब ! मी CA करते म्हटलं तर वडील म्हणाले की तू एवढी शिकलीस तर तुला नवरा कसा पाहायचा? तू B.Com, M.Com हो मग आपण लग्नाचच पाहू. मी M.Com झाले. 3rd रँक आल्यामुळे धारवाडच्या Govt. कॉलेज मधून बोलावणं आलं आणि लगेचच लेक्चरर म्हणून नोकरी मिळाली. तसं लहानपनापासूनच मी शिक्षक होण्याचं स्वप्न पाहिलं होतं मोठी झाल्यावर मला वाटू लागलं की, आपण लेक्चरर व्हायला पाहिजे. पण क्लार्क म्हणून बँकमध्ये, पोस्टामध्ये वगैरे पूर्ण वेळ नोकरी करायची नाही, हे मात्र माझं निश्चित ठरलेलं होतं. कॉमर्स शाखेमध्ये लेक्चरर असण्याचा असाही फायदा आहे की तीन-चार तासच काम करावं लागतं. आणि बराच वेळ मोकळा मिळतो. मला संसारही नीटनेटका करावा याची आवड आहे. घर सजविण्याची आवड आहे. त्यामुळे पुर्ण वेळ नोकरी मला करायची नव्हती.’’

वडिलांची पुण्याला बदली झाली. त्यामुळे मी सुध्दा धारवाडच्या (Govt. Collage) सरकारी महाविद्यालयातील नोकरीचा राजीनामा देऊन पुण्याला आले. ८६ साली लग्न झालं. एक-दोन वर्षे कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून नोकरीसुध्दा केली. एकदा माझ्या सासूबाई म्हणाल्या की तुझी CA करण्याची इच्छा होती ना, तर तू CA का करत नाहीस. माझ्या मनगटात जोर आहे तोपर्यंत मी घरचं सगळ पाहीन. तू अभ्यास कर. तेव्हा माझी मुलगी तीन महिन्याची होती. CA सारखा कठीण अभ्यासक्रम मला जमेल का असे वाटले. तू अभ्यास सुरू कर, पुढचं पुढे पाहू, असे सासूबाई म्हणाल्या. पती विनायक यांनीही प्रोत्साहन दिलं आणि मी CA करण्याचा निर्णय घेतला. एकदा निर्णय घेतल्यावर मी पूर्णपणे त्यात झोकून दिलं. परीक्षेच्या आधी चार महिने मी सकाळी सात तर रात्री दहा ग्रंथालयात जाऊन अभ्यास करत असे. सासूबाई लवकर उठून डबा करून देत असत. विनायक मला सोडवायला आणि आणायला येत असत. सगळ्यांच्या सहकार्यामुळे तीन वर्षात प्रथम प्रयत्नात माझं CA पूर्ण झाल. ’’

त्यांनी केला आहे ते रेखाताई आणि त्यांचे पती श्री. विनायक जोशी यांनी मला प्रात्यक्षिकांसह दाखविले.

‘‘ प्रत्येकी ५०० विद्यार्थी बसू शकतील असे दोन हॉल इथे आहेत. एका हॉलमध्ये मी प्रत्यक्ष शिकवते आणि दुसऱ्या हॉलमध्ये मी टी. व्ही वर दिसते. दोन्ही हॉलमध्ये दोन-दोन मोठे स्क्रीनस् आहेत. फळ्यावर लिहिण्याऐवजी मी ‘नोटबुक’(लॅपटॉप) वर लिहिते ते चारही स्क्रीनस् वर दिसतं. CCC TV मुळे दुसऱ्या क्लासमधली मुलंही मला दिसत असतात.

मुलांना एखादं गणित सोडवायला दिलं की तोपर्यंत दुसऱ्या क्लासरुममध्येही जाऊन येते. कोणाला काही प्रश्न विचारायचे असतील तर एका चिठ्ठीवर लिहून ते माझ्याकडे पाठवू शकतात.’’

श्री. जोशी हे आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ असल्यामुळे त्यांच्या कल्पनेतून हे सर्व तंत्रज्ञान इथे वापरले आहे. बाकीच्या विषयांसाठी वेगळ्या क्लासरुम्स् आहेत. सर्व मिळून दरवर्षी ३००० विद्यार्थी रेखाताईंच्या ॲकॅडमी मधून शिक्षण घेतात. रेखाताईंची ॲकॅडमी बघितल्यावर त्यांचा द्रष्टेपणा, त्यांची सौंदर्यदृष्टी, शिस्तबध्दता याचा प्रत्यय आला. इतक्या वर्षांनंतर, एवढा जम बसल्यावर सुध्दा (Established) रेखाताई त्यांच्या प्रत्येक लेक्चरच्या बाबतीत अत्यंत जागरूक असतात.

एखाद्या दिवशी लेक्चर त्यांच्या मनासारखं झाल नाही तर त्या अस्वस्थ होतात. त्यांना झोप लागत नाही. त्यांच्या नोटस् दरवर्षी Update केल्या जातात. (नव्याने तयार केल्या जातात.) मागच्या वर्षीच्या नोटस् पुन्हा वापरत नाहीत. स्पर्धेच्या या युगात आपली मूल्ये जपत प्रगती करत राहाणं किंवा टिकून रहाणं ही तारेवरची कसरतच आहे.

रेखाताई उत्साही आहेत. हरहुन्नरी आहेत. त्यांच्या आवडीनिवडीविषयी आणि छंदाविषयी विचारल्यावर त्या म्हणाल्या, ‘‘ मला बागकाम करायला खूप आवडतं, ड्रॉइंगचही मला आवड आहे पण सध्या त्यासाठी मी वेळ देऊ शकत नाही, घराची सजावट करायला मला आवडतं, फिटनेससाठी जिमला जायला आवडतं. मला लहानपणापासूनच प्रवासाची खूप आवड आहे. प्रवास सुध्दा थोडेसे Adventours (साहसी) असेच करायला आवडतात. मला फारशी कशाची भिती वाटत नाही.’’

‘‘श्री. जोशी यांना सुध्दा माझ्याप्रमाणेच प्रवासाची आवड आहे. सुरुवातीला परदेशप्रवास केला. त्याच्यात बऱ्याच ठिकाणी Touch & Go असंच करावं लागतं. मग आम्ही ठरवलं की आपलं आपणच दोघांनी फिरायचं. आम्ही दोघं अंटार्क्टिका (Antarctica) ला गेलो होतो. अतिशय सुंदर आणि रोमांचकारी (Thrilling) अनुभव होता तो! तिथे हॉटेलस वगैरे काही नाहीत, १३ दिवस जहाजावरच राहायचं. अतिशय थंड (Minus Degree) हवामान आणि प्रगाढ शांतता! बर्फातलं प्राणिजीवनही जवळून पाहता आलं.! फॉल्सच्या इथे आम्ही बंजी जपिंग केल. आम्ही जेव्हा अमेरिकेला गेलो होतो तेव्हा हवाईला गेलो. तिथं लाइव्ह व्होल्कॅनो आहे असं कळलं होत. त्यावेळी तो व्होल्कॅनो इरप्ट होऊन पाच-सहा वर्षे झाली होती. पण अजूनही तिथे लाव्हा वाहतो आहे असं कळल्यामुळे आम्ही तिथे जायचं ठरवलं. अगदी दोन-तीन फुटांवरून लाव्हा वाहताना आम्ही पाहिला. तो अगदी घट्ट असा असतो. कासवासारखा हळूहळू पुढे सरकत असतो आणि समुद्राला जाऊन मिळतो. वरून जी पूर्ण राख दिसत असली तरी आपण त्यात दगड वगैरे टाकला तर आत पूर्ण धगधगता असा अग्नी असतो. आम्ही हेलिकॉप्टर राईड घेतली होती. सर्व बाजूंनी तो लाव्हा समुद्रात मिसळत असतो, ते सर्व दृष्य आम्हाला अनुभवता आलं. असा थोडासा वेगळ्या प्रकारचा (Of-Beat) प्रवास करायला आम्हाला आवडतो.

रेखाताईंच्या करिअरचा प्रवासही थक्क करणारा

.

असाच आहे. एका मध्यमवर्गीय, मराठी कुटुंबातील संसारी स्त्रीने, मोठ्या कोचिंग क्लासचं स्वप्न पाहणं आणि स्वतंत्रपणे, जिद्दीने ते पूर्ण करणं ही खरोखरच कौतुकास्पद आणि आम्हा मराठी लोकांसाठी अभिमानास्पद अशी गोष्ट आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आपल्याला हवं. त्याचप्रमाणे आपल्याला काय करायचं नाही याबद्दलही स्पष्टता असायला हवी. रेखाताई, या एक यशस्वी गृहिणी, यशस्वी उद्योजिका, यशस्वी शिक्षिका आहेत. त्यांना त्यांच्या यशाबद्दल काय वाटतं असं विचारल्यावर त्या म्हणाल्या, ''मी अत्यंत समाधानी आहे. यश म्हणजे केवळ करियर मधलं यश असं मी मानत नाही. जीवनातील छोट्या छोट्या आनंदाचा अनुभव घेता येणे, नातेसंबंधामध्ये जिव्हाळ्याचे आणि मैत्रिपूर्ण वातारण असणे, जीवनातील मूल्ये जतन केल्यामुळे आत्मिक समाधान लाभणे म्हणजे यश.''

रेखाताईशी तास दीड तास मनमोकळ्या गप्पा मारल्यानंतर एका खूप चांगल्या व्यकितीला भेटल्याचं समाधान लाभलं. त्यांना त्यांच्या पुढच्या आयुष्यासाठी भरपूर शुभेच्छा देऊन मी त्यांचा निरोप घेतला.

– रेखा जोशी, (०२०) २४३३०९४१
– सुनंदा कवठेकर, मो. : ९५६१६१३५३७

❖ ❖ ❖

**आलेल्या संधीचा पुरेपूर फायदा घ्या आणि संधी नसेल तेव्हा ती निर्माण करा. माझ्या मते हेच यशाचे रहस्य आहे.**

***– शंतनुराव किर्लोस्कर***

❖

**यश म्हणजे काय ? तर अपयशामळे उमेद न गमावता पुढे जात राहणं**

***– अब्राहम लिंकन***



## ‘विठुमाऊली’

पंढरीत माझ्या
भक्तीचा सोहळा
फुले भक्ती मळा
विठ्ठलाचा...।।१ ।।

विठ्ठलाचा संग
न सोडवी आता
तुकोबाची गाथा
आळवावी... ।।२ ।।

आळवावी व्यथा
विठ्ठलाच्यापाशी
न राही उपाशी
भक्त कुणी... ।।३ ।।

कुणी ही परका
विठ्ठलासी नाही
दुजा भाव नाही
विठुमनी... ।।४ ।।

विठुमनी वसे
तोची भाग्यवंत
नाही मन खंत
तेजुचिय... ।।५ ।।

**– तेजश्री पाताडे**
**मो. : ८८९८८३९४३९**